Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

दैनिक

अतुल्य महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ बीड महाराष्ट्र | शुक्रवार, 20 नोव्हेंबर 2026 | अंक क्र. 180 | वर्ष 4 थे | मुल्य 3 रूपये | पृष्ठे 4

आपल्याकडे काही न्युज संबंधित महत्वाचे व्हीडिओ असतील तर खालील नंबर पाठवा.
मो. 8421577797
आपले नाव गुपीत ठेवण्यात येईल

मुख्य संपादक : नितीन ढाकणे | वृत्त संपादक : संतोष सानप | उपसंपादक : अमोल सुर्यवंशी | उप संपादक : अशोक दळवे | विशेष प्रतिनिधी : भगवान साकसमुद्रे

दिवाळीत नाशिक एसटी विभागाची बंपर कमाई, 25.67 कोटींचा महसूल, उत्पन्नात 1.35 कोटींची वाढ

दिवाळीच्या काळात ८०१ बसगाड्यांच्या माध्यमातून ४३.१५ लाख किलोमीटरचा प्रवास पूर्ण करून नाशिक विभागाने २५.६७ कोटी रुपयांचा महसूल मिळवला. गतवर्षीच्या तुलनेत यंदा उत्पन्नात १ कोटी ३५ लाख रुपयांची वाढ झाली आहे.

■ नाशिक : वृत्तसंस्था

दिवाळीच्या सुट्ट्यांमध्ये गावी जाणारे प्रवासी आणि पर्यटनासाठी बाहेर पडणाऱ्यांची संख्या वाढल्याने एसटी महामंडळाच्या नाशिक विभागाला मोठा आर्थिक फायदा झाला आहे. सणासुदीच्या काळात प्रवाशांनी एसटी प्रवासाला दिलेल्या पसंतीमुळे विभागाने तब्बल २५ कोटी ६७ लाख रुपयांचा महसूल मिळवला आहे. विशेष म्हणजे, गतवर्षीच्या तुलनेत यंदा उत्पन्नात १ कोटी ३५ लाख रुपयांची वाढ नोंदवण्यात आली आहे.

८०१ बस, २०० जादा फेऱ्या

दिवाळीच्या काळात प्रवाशांची होणारी गर्दी लक्षात घेऊन नाशिक विभागाने जिल्ह्यातील विविध बसस्थानकांवरून जादा बसगाड्यांचे नियोजन केले होते. विभागातील ८०१ बसगाड्यांच्या माध्यमातून २०० जादा फेऱ्या चालवण्यात आल्या. या कालावधीत एसटीने एकूण ४३.१५ लाख किलोमीटरचा प्रवास पूर्ण केला. गतवर्षीच्या तुलनेत यंदा प्रवासी वाहतुकीतही १.०२ लाख किलोमीटरची वाढ झाली आहे.

नाशिक-पुणे मार्गावरील एसी बसला मोठी पसंती

दिवाळीच्या काळात नाशिक-पुणे मार्गावरील सर्व वातानुकूलित बसगाड्यांचे आरक्षण १०० टक्के झाले होते. याशिवाय धुळे, नंदुरबार आणि छत्रपती संभाजीनगर या प्रमुख मार्गांवरही प्रवाशांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. सप्तशृंग गड आणि त्र्यंबकेश्वर या धार्मिक स्थळांकडे जाणाऱ्या भाविकांसाठीही जादा बसफेऱ्यांचे नियोजन करण्यात आले होते.

महिलांसाठीही विशेष सुविधा

भाऊबीजेच्या निमित्ताने प्रवास करणाऱ्या महिलांची संख्या लक्षात घेऊन महामंडळाने एनएमसीएस कार्डची अट शिथिल केली होती. त्यामुळे अनेक महिला प्रवाशांना या सुविधेचा लाभ घेता आला. दरम्यान, दिवाळी पाडव्यानंतर मुंबई नाका, मध्यवर्ती बसस्थानक आणि निमाणी बसस्थानक येथे प्रवाशांची मोठी गर्दी झाली होती. सुट्ट्या संपल्यानंतर नोकरी आणि शिक्षणासाठी मुंबई-पुण्यासह अन्य शहरांकडे परतणाऱ्या प्रवाशांची संख्याही वाढली होती.

गतवर्षीपेक्षा १.३५ कोटींचे अधिक उत्पन्न

दिवाळीच्या काळात ८०१ बसगाड्यांच्या माध्यमातून ४३.१५ लाख किलोमीटरचा प्रवास पूर्ण करून नाशिक विभागाने २५.६७ कोटी रुपयांचा महसूल मिळवला. गतवर्षीच्या तुलनेत यंदा उत्पन्नात १ कोटी ३५ लाख रुपयांची वाढ झाली आहे. विभाग नियंत्रक भगवान जगनोर यांनी ही माहिती दिली. आगार व्यवस्थापक, चालक, वाहक आणि यांत्रिक कर्मचाऱ्यांच्या नियोजनबद्ध कामामुळे हा विक्रमी महसूल मिळवणे शक्य झाल्याचेही त्यांनी नमूद केले.



आजपासून बुलेट ट्रेनच्या ट्रॅकवर हाय- व्होल्टेज वीजपुरवठा सुरू होणार, पण ट्रेन केव्हापासून धावणार?

■ मुंबईः वृत्तसंस्था

भारत देश वाहतूक क्षेत्रात नवा इतिहास रचण्याची तयारी वेगाने सुरू करत आहे. 2027 मध्ये मुंबई- अहमदाबाद हाय- स्पीड रेल कॉरिडोरचा टप्पा सुरू होण्याची शक्यता आहे. मुंबई- अहमदाबाद मार्गावर देशामध्ये पहिली बुलेट ट्रेन प्रवाशांच्या सेवेत दाखल होणार आहे. या भव्य प्रकल्पासाठी 20 नोव्हेंबर हा दिवस अत्यंत महत्त्वाचा ठरत आहे, कारण सूरत आणि बिलिमोरा दरम्यानच्या पहिल्या टप्प्यात वीजपुरवठा सुरू करण्यात येणार आहे. देशातील पहिली बुलेट ट्रेन रुळांवरून धावण्यापूर्वीचा हा मोठा आणि निर्णायक टप्पा मानला जात आहे.

गँगस्टर नसीम दुर्रानीचा गोळ्या झाडून खात्मा, नोएडा एसटीएफ आणि दिल्ली पोलिसांच्या संयुक्त पथकाने केली संयुक्त कारवाई

नवी दिल्ली: कुख्यात गँगस्टर नसीम दुर्रानी याची गोळ्या झाडून त्याला ठार मारण्यात आले आहे. नोएडा एसटीएफ आणि दिल्ली पोलीस यांनी संयुक्त रित्या ही मोहिम ...

नॅशनल हाय-स्पीड रेल कॉर्पोरेशन लिमिटेडने या संदर्भातील माहिती त्यांच्या सोशल मिडिया अकाऊंटवरून शेअर केली आहे. मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन कॉरिडोरमधील सूरत ते बिलिमोरा दरम्यानच्या 50 किमी लांबीच्या पहिल्या पट्ट्याला ओव्हरहेड इक्विपमेंटद्वारे वीजपुरवठा करण्यात येणार आहे. हा संपूर्ण कॉरिडोर प्रोजेक्ट, प्रगत 2× 25 KV ओव्हरहेड ट्रॅक्शन प्रणालीने सुसज्ज केला जात आहे. यामध्ये एलिव्हेटेड मार्गावरील अप आणि डाउन अशा दोन्ही मार्गिकांचा समावेश आहे. ही हाय- स्पीड बुलेट ट्रेन चालवण्यासाठी 2× 25 KV ओव्हरहेड ट्रॅक्शन प्रणालीच्या माध्यमातून वीजपुरवठा देण्यात येणार आहे. मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनच्या मार्गादरम्यान, संपूर्ण विद्युतीकरण जाळ्यात 14 ट्रॅक्शन सबस्टेशन असतील. त्यापैकी 9 गुजरातमध्ये आणि 5 महाराष्ट्रात उभारण्यात येत आहेत. 508 किमी लांबीच्या या मार्गावर ठराविक ठिकाणी ही सबस्टेशन कार्यरत राहणार आहे. ग्रीडमधून वीज घेऊन ती ओव्हरहेड यंत्रणेकडे पोहोचवण्याचे काम या माध्यमातून करण्यात येणार आहे. या संपूर्ण विद्युत जाळ्याचे नियंत्रण आणि देखरेख एका सेंट्रलाइज्ड कंट्रोल सेंटरद्वारे केली जाणार आहे. दरम्यान, वीजपुरवठा सुरू केला जात असल्यामुळे रेल्वे प्रशासनाने सर्वांना विशेष खबरदारीचा इशारा दिला आहे. मार्गालगत राहणारे नागरिक, प्रवास करणारे, बांधकामाशी संबंधित कर्मचारी आणि परिसरातील इतर लोकांनी ओव्हरहेड विद्युत उपकरणांच्या जवळ जाऊ नये तसेच त्यांना हात लावू नये, असे स्पष्ट आवाहन करण्यात आले आहे. ही बुलेट ट्रेन पूर्ण क्षमतेने जेव्हापासून सुरू होईल, तेव्हापासून ती ताशी 320 किलोमीटर इतका वेग गाठू शकेल. तर 2027 पासून अहमदाबाद ते मुंबई दरम्यान सरासरी ताशी 300 किलोमीटर वेगाने चालवली जाण्याची शक्यता आहे.

देशाच्या हवामानात मोठा बदल! ओडिशात ३ लाख नागरिकांचे स्थलांतर, अनेक राज्यांना पावसाचा इशारा

■ मुंबई वृत्तसंस्था

देशाच्या पूर्व किनारपट्टीवर 'अक्वान' चक्रीवादळाचे संकट निर्माण झाले असून, ओडिशा आणि आंध्र प्रदेशमध्ये प्रशासनाकडून युद्धपातळीवर तयारी सुरू आहे. या चक्रीवादळाचा परिणाम देशातील अनेक राज्यांमध्ये जाणवण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. ओडिशामध्ये संभाव्य धोका लक्षात घेऊन आतापर्यंत जवळपास 3 लाख नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले आहे. नागरिकांच्या मदतीसाठी आपत्ती व्यवस्थापन विभागाची पथकेही तैनात करण्यात आली आहेत.

चक्रीवादळामुळे संभाव्य नुकसान टाळण्यासाठी ओडिशा सरकारने मोठ्या प्रमाणावर बचावकार्य हाती घेतले आहे. सरकारी आकडेवारीनुसार, गुरुवारी संध्याकाळपर्यंत 2 लाख 98 हजार 676 नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले होते. नागरिकांसाठी 2 हजार 523 मदत छावण्या आणि 9 हजार 341 चक्रीवादळ निवारा केंद्रांची तयारी करण्यात आली आहे. तसेच एनडीआरएफ, ओडीआरएएफ आणि अग्निशमन दलाच्या पथकांना संवेदनशील भागांमध्ये तैनात करण्यात आले आहे. अक्वान चक्रीवादळाचा प्रभाव ओडिशापुरता मर्यादित राहण्याची शक्यता नाही. पश्चिम बंगाल, झारखंड, बिहार आणि छत्तीसगडच्या काही भागांमध्येही पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. काही ठिकाणी मेघगर्जनेसह पाऊस आणि विजांचा कडकडाट होण्याची शक्यता आहे.

राजाभाऊ लिमये यांच्या निधनाने रत्नागिरी जिल्ह्याच्या सार्वजनिक जीवनातील ज्येष्ठ नेतृत्व हरपले



■ दापोली (वृत्तसंस्था)

रत्नागिरी जिल्ह्याच्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक आणि पत्रकारिता क्षेत्रातील ज्येष्ठ व्यक्तिमत्त्व, आर. व्ही. बेलोसे शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष आणि रत्नागिरी जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष वसंत विष्णू तथा राजाभाऊ लिमये (वय ९१) यांचे गुरुवारी, १९ नोव्हेंबर रोजी निधन झाले. त्यांच्या निधनाने जिल्ह्याच्या सार्वजनिक जीवनातील अनुभवी, अभ्यासू आणि विकासाभिमुख नेतृत्व काळाच्या पडद्याआड गेले आहे. राजाभाऊ लिमये यांनी १९५६-५७ पासून काँग्रेसच्या माध्यमातून राजकीय व सामाजिक कार्याला सुरुवात केली. १९९२ ते १९९७ या काळात त्यांनी रत्नागिरी जिल्हा परिषदेचे अध्यक्षपद भूषविले. ग्रामीण विकास, शिक्षण आणि औद्योगिक गुंतवणुकीसाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. फिनोलेक्स इंडस्ट्रीज आणि जयगड येथील जिंदाल उद्योगसमूहाच्या उभारणीच्या प्रक्रियेत त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान होते.

आर. व्ही. बेलोसे शिक्षण संस्थेशी जिव्हाळ्याचे नाते


■ दापोलीच्या आर. व्ही. बेलोसे शिक्षण संस्थेचे अध्यक्ष म्हणून त्यांनी २०१२-१३ ते २०२१-२२ या काळात काम पाहिले. संस्थापक अध्यक्ष रा. वि. तथा बाबूरावजी बेलोसे आणि तत्कालीन अध्यक्ष ॲड. बाळासाहेब बेलोसे यांच्यामुळे त्यांचे संस्थेशी जिव्हाळ्याचे संबंध निर्माण झाले. संस्थेच्या विविध विकासकामांत त्यांनी मोलाचे सहकार्य केले. संस्थापक अध्यक्षांचा चरित्रग्रंथ प्रकाशन, महिला वसतिगृह आणि ग्रंथालय इमारतीचे उद्घाटन तसेच स्वातंत्र्यसैनिक प्रभाकर कुंटे सोल्जर अकॅडमीच्या अनावरणासाठी ज्येष्ठ नेते शरद पवार यांना संस्थेत आणण्यात त्यांची महत्त्वपूर्ण भूमिका होती.

■ संस्थेचे कार्यवाह डॉ. दशरथ भोसले यांनी त्यांच्या आठवणींना उजाळा देताना सांगितले की, राजाभाऊ त्यांना 'काका' आणि ॲड. बाळासाहेब बेलोसे यांना 'बाळ' म्हणून हाक मारत. त्यांचे संबंध केवळ संस्थात्मक नव्हते, तर कौटुंबिक जिव्हाळ्याचे होते. बाळासाहेब बेलोसे यांच्या निधनाची बातमी समजताच राजाभाऊ तातडीने दापोलीत आले होते. त्या वेळी त्यांना अश्रू अनावर झाले होते.

■ राजाभाऊंच्या प्रेमळ स्वभावाची आठवण सांगताना डॉ. भोसले म्हणाले, "रत्नागिरीतून निघताना वडीलकीच्या नात्याने डोक्यावर ठेवलेला त्यांचा आशीर्वाद आम्हाला नेहमी बळ देत असे. आज आमचे मायेचे छत्र हरपले असून आम्ही पोरके झालो आहोत. आता रत्नागिरीला गेल्यावर त्यांच्या आठवणीने डोळे ओलावतील."

■ संस्थेच्या अडचणीच्या प्रसंगी सल्ला आणि मार्गदर्शन करणाऱ्या राजाभाऊंची उणीव कायम जाणवत राहील, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. संस्थेचे सभापती श्री. धनंजय यादव, कार्यवाह डॉ. दशरथ भोसले, प्राचार्य डॉ. भारत कऱ्हाड, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. राजाभाऊ लिमये यांच्या निधनाने रत्नागिरी जिल्ह्याने ज्येष्ठ मार्गदर्शक, तर आर. व्ही. बेलोसे शिक्षण संस्थेने आपला माजी अध्यक्ष आणि जिव्हाळ्याचा हितचिंतक गमावला आहे.

पत्रकारितेच्या क्षेत्रातही त्यांनी दीर्घकाळ कार्य केले. १९६१ ते २०१२ या काळात 'सत्यशोधक' साप्ताहिकाचे संपादन केले. पीटीआयचे राज्य प्रतिनिधी तसेच इंडियन एक्स्प्रेस आणि लोकसत्ता या दैनिकांचे जिल्हा प्रतिनिधी म्हणून त्यांनी काम पाहिले. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे कोकण विभागीय अध्यक्ष आणि केंद्रीय नारळ बोर्डाचे सदस्य व उपाध्यक्ष म्हणूनही त्यांनी जबाबदारी सांभाळली.



फुटबॉलचा जादूगार



रोनाल्डोने आंतरराष्ट्रीय कारकिर्दीला सुरुवात केली तेव्हा पोर्तुगालची ओळख प्रामुख्याने 'विजेतेपदाचा दावेदार' अशी होती. मात्र, या संघाला प्रत्यक्ष जेतेपदाचा धनी बनवण्यात मोठा वाटा होता तो त्याचाच. त्याच्या कारकिर्दीच्या उत्तरार्धात मात्र चित्र बदलत गेले.

कामगिरी, सातत्य, हुशारी आणि खिलाडूवृत्ती यांच्या जोरावर ख्रिस्तियानो रोनाल्डोने दोन दशकांहून अधिक काळ पोर्तुगाल फुटबॉल संघातील आपले स्थान अबाधित राखले व फुटबॉलविश्व गाजवले. गेल्या गुरुवारी त्याच्या आंतरराष्ट्रीय निवृत्तीची घोषणा सोशल मीडियाच्या व्यासपीठावरून झाली. यंदा जून-जुलैदरम्यान झालेल्या वर्ल्ड कपमध्ये रोनाल्डोसारखा दिग्गज खेळाडू पोर्तुगाल संघात काहीसा एकटा पडल्यासारखा जाणवत होता. त्यातच अलीकडे प्रशिक्षकांशी झालेल्या मतभेदांमुळे तरुणांच्या गळ्यातील हा ताईत आता पोर्तुगाल संघालाच नकोसा झाला आहे का, अशी चर्चा सुरू झाली होती. ४१ वर्षीय रोनाल्डोने २३४ सामन्यांत पोर्तुगालचे प्रतिनिधित्व करताना विक्रमी १४६ गोल केले. पोर्तुगालला युरोपियन विजेतेपद मिळवून देण्यात त्याने मोलाची भूमिका बजावली.

रोनाल्डोने आंतरराष्ट्रीय कारकिर्दीला सुरुवात केली तेव्हा पोर्तुगालची ओळख प्रामुख्याने 'विजेतेपदाचा दावेदार' अशी होती. मात्र, या संघाला प्रत्यक्ष जेतेपदाचा धनी बनवण्यात मोठा वाटा होता तो त्याचाच. त्याच्या कारकिर्दीच्या उत्तरार्धात मात्र चित्र बदलत गेले. प्रशिक्षक जॉर्ज जीझस यांच्याशी त्याचे मतभेद झाले.

अलीकडेच नॉर्वेविरुद्धच्या लढतीत जीझस यांनी रोनाल्डोला राखीव खेळाडूंच्या बाकावर बसवले. आता पोर्तुगाल संघात आपले स्थान अनिश्चित आहे, याची जाणीव त्याला त्या क्षणी झाली असावी. पोर्तुगालने २०१६मध्ये युरोपियन चॅम्पियनशिपचे पहिले मोठे विजेतेपद जिंकले. त्यानंतर २०१९ आणि २०२५ मध्ये नेशन्स लीगचा करंडकही पटकावला. या यशामध्ये रोनाल्डोचा मोठा वाटा होता. फुटबॉलविश्वातील सर्वोच्च मानाचे वर्ल्ड कप विजेतेपद मात्र रोनाल्डोला मिळवता आले नाही, ही खंत आहेच. रोनाल्डोचा हा निरोप म्हणजे तो पोर्तुगाल फुटबॉलच्या एका सुवर्णयुगाचा, फुटबॉलमधील जादुई कारकिर्दीचा भावनिक समारोप आहे. फुटबॉलच्या इतिहासात त्याचे नाव सदैव आदराने घेतले जाईल.

ही संधी पुन्हा नाही, रोहित-विराटसाठी शेवटचा चान्स, पाचव्या सामन्यात प्रतिक्षा संपवणार?

■ ऑकलंड : वृत्तसंस्था

रोहित शर्मा आणि विराट कोहली या भारताच्या अनुभवी जोडीला न्यूझीलंड विरूद्धच्या एकदिवसीय मालिकेत लौकीकाला साजेशी कामगिरी करता आली नाही. त्यामुळे या दोघांकडे या मालिकेतील शेवटच्या सामन्यात शतक करुन दौऱ्याचा अविस्मरणीय शेवट करण्याची संधी आहे.



श्रेयस अय्यर कर्णधार म्हणून त्याच्या पहिल्याच सामन्यात भारतीय संघाला विजयी करण्यात अपयशी ठरला. शुभमन गिल याच्या नेतृत्वात भारताने पहिले आणि सलग २ सामने जिंकून २-० अशी आघाडी मिळवली. त्यानंतर तिसरा सामना पावसामुळे रद्द करण्यात आला. त्यामुळे न्यूझीलंडला मोठा दिलासा मिळाला आणि भारताच्या मालिका विजयाची प्रतिक्षा लांबली. त्यानंतर भारतीय संघाने चौथ्या सामन्यात १३ नोव्हेंबरला निराशाजनक कामगिरी केली. न्यूझीलंडने भारताचा २४४ धावांनी धुव्वा उडवला. न्यूझीलंडने भारतासमोर विजयासाठी ३३४ धावांचं आव्हान ठेवलं होतं. मात्र मॅट हेन्री याने सर्वाधिक ६ झटके देत भारताला अवघ्या ८९ धावांवर गुंडाळलं. भारताचा हा एकदिवसीय क्रिकेटमधील धावांबाबत दुसरा मोठा पराभव ठरला.

या सामन्यात भारताच्या नवख्यांसह अनुभवी फलंदाजही अपयशी ठरले. ऋतुराज गायकवाड व्यतिरिक्त रोहित शर्मा आणि विराट कोहली या अनुभवी जोडीला भोपळाही फोडता आला नाही. न्यूझीलंड ने चौथा सामना जिंकत मालिकेतील विजयाचं खातं उघडलं. त्यामुळे पाचवा आणि अंतिम सामना निर्णायक होणार आहे. भारताकडे हा सामना जिंकून मालिका नावावर करण्याची संधी आहे. तर न्यूझीलंड मालिका बरोबरीत सोडवण्यासाठी मैदानात उतरणार आहे. या सामन्यात विराट कोहली आणि रोहित शर्मा या दोघांकडे अनेक वर्षांची प्रतिक्षा संपवण्याची संधी आहे. त्यामुळे रोहित आणि विराट ही प्रतिक्षा संपवण्यात यशस्वी ठरणार का? हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

विराटने या मालिकेतील सलामीच्या सामन्यात अर्धशतक लगावलं. मात्र त्यानंतर विराटने निराशा केली. तर रोहित या मालिकेत दुसऱ्यांदा शून्यावर बाद झाला. चाहत्यांना या दोघांकडून शतकाची अपेक्षा होती. मात्र दोघेही चाहत्यांची ती अपेक्षा पूर्ण करण्यात अपयशी ठरले. तसंच रोहितला न्यूझीलंडमध्ये एकदिवसीय सामन्यांत शतक करता आलेलं नाही. तर विराटला न्यूझीलंडमध्ये शतक करुन अनेक वर्ष झाली आहेत. दोघेही त्यांच्या कारकीर्दीच्या शेवटच्या टप्प्यात आहेत. दोघांचाही हा शेवटचा न्यूझीलंड दौरा आहे. उभयसंघातील पाचवा आणि अंतिम सामना हा रविवारी १५ नोव्हेंबरला होणार आहे. दोघांचाही हा न्यूझीलंडमधील शेवटचा आंतरराष्ट्रीय सामना असणार आहे. त्यामुळे रोहित-विराट दोघेही अंतिम सामन्यात शतक करुन न्यूझीलंड दौऱ्याचा अविस्मरणीय शेवट करणार का? याकडे क्रिकेट विश्वाचं लक्ष असणार आहे. रोहितला न्यूझीलंड विरुद्ध कोणत्याही फॉर्मेटमध्ये शतक करता आलेलं नाही. रोहितने न्यूझीलंडमध्ये न्यूझीलंड विरुद्ध एकूण १८ एकदिवसीय सामन्यांमध्ये ४६० धावा केल्या आहेत. रोहितने या दरम्यान ४ अर्धशतकं लगावली आहेत. रोहितची न्यूझीलंडमधील ८७ ही सर्वोच्च धावसंख्या आहेत. तसंच विराटने न्यूझीलंडमध्ये शेवटचं शतक हे १२ वर्षांआधी २०१४ साली लगावलं होतं. विराटने तेव्हा १२३ धावा केल्या होत्या. विराटने न्यूझीलंडमध्ये न्यूझीलंड विरुद्ध १७ सामन्यांत १ शतक आणि ५ अर्धशतकांसह एकूण ६७७ धावा केल्या आहेत.

न्यूझीलंड-इंडिया चौथ्या सामन्यानंतर संघात बदल

■ ऑकलंड : वृत्तसंस्था

न्यूझीलंडने शुक्रवारी १३ नोव्हेंबरला चौथ्या एकदिवसीय सामन्यात टीम इंडिया विरुद्ध सर्वात मोठा विजय मिळवला. न्यूझीलंडने भारतावर २४४ धावांनी मात केली. त्यामुळे पाचवा आणि अंतिम सामना रंगतदार होणार आहे. मात्र पाचव्या सामन्यासाठी यजमान टीम नव्या संघासह मैदानात उतरणार आहे.

न्यूझीलंड ने टीम इंडियाचा बे ओव्हलमध्ये झालेल्या चौथ्या एकदिवसीय सामन्यात २४४ धावांनी धुव्वा उडवला. न्यूझीलंडने भारतासमोर ३३४ धावांचं आव्हान ठेवलं होतं. भारताला या लक्ष्याचा पाठलाग करताना १०० धावाही करता आल्या नाहीत. न्यूझीलंडच्या गोलंदाजांसमोर भारताचं ८९ धावांवर पॅकअप झालं. भारताचा हा अशाप्रकारे एकदिवसीय क्रिकेटमधील धावांबाबत दुसरा आणि न्यूझीलंड विरुद्धचा सर्वात मोठा पराभव ठरला. मॅट हेन्री हा न्यूझीलंडच्या या विजयाचा नायक ठरला. एकट्या मॅटने ६ विकेट्स घेतल्या. मॅटला त्याच्या या कामगिरीसाठी मॅन ऑफ द मॅच पुरस्काराने गौरवण्यात आलं.

न्यूझीलंडचा हा टीम इंडिया विरुद्धचा धावांबाबत सर्वात मोठा विजय ठरला. न्यूझीलंडने यासह मालिकेतील विजयाचं खातं उघडलं. तसंच न्यूझीलंडने मालिकेतील आपलं आव्हानही कायम राखलं. न्यूझीलंड या ५ सामन्यांच्या मालिकेत १-२ ने पिछाडीवर आहे. उभयसंघातील १ सामना हा पावसामुळे रद्द झालाय. त्यामुळे पाचवा आणि अंतिम सामना हा सीरिज डिसायडर असणार आहे. भारताला हा सामना जिंकून मालिका जिंकण्याची संधी आहे. तर न्यूझीलंडकडे सलग दुसरा सामना जिंकून मालिका बरोबरीत सोडवण्याची दुहेरी संधी आहे. त्यामुळे पाचवा सामना ब्लॉकबस्टर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. उभयसंघातील पाचवा आणि अंतिम सामना रविवारी १५ नोव्हेंबरला होणार आहे. मात्र न्यूझीलंड चौथ्या सामन्यातील विजयानंतरही फायनलमध्ये बदलासह उतरणार आहे.



शनिवारी टीम इंडिया-पाकिस्तान महामुकाबला

■ ओमान : वृत्तसंस्था



अंडर १९ आशिया कप २०२६ स्पर्धेचा विजेता येत्या काही तासांत निश्चित होणार आहे. या स्पर्धेच्या अंतिम फेरीत ए ग्रुपमधील २ संघ पोहचले आहेत. आशिया कप ट्रॉफीसाठी टीम इंडिया विरुद्ध पाकिस्तान यांच्यात महामुकाबला होणार आहे. महाअंतिम सामन्याच्या निमित्ताने दोन्ही संघ आठवड्याभरात दुसऱ्यांदा आमनेसामने असणार आहेत. पाकिस्तानने याआधी साखळी फेरीत झालेल्या सामन्यात भारताला पराभूत केलं होतं. पाकिस्तानने रविवारी ८ नोव्हेंबरला झालेल्या सामन्यात भारतावर ३ विकेट्सने विजय मिळवला होता. त्यामुळे आता टीम इंडिया या पराभवाचा हिशोब करत आशिया चॅम्पियन होण्याचा बहुमान मिळवणार की पाकिस्तान गतविजेता म्हणून ट्रॉफी राखण्यात यशस्वी ठरणार? हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

दोन्ही संघांचा अंतिम फेरीपर्यंतचा प्रवास

भारतीय क्रिकेट संघाने अफगाणिस्तान टीमला पराभूत करुन फायनलचं तिकीट मिळवलं. तर पाकिस्तानने सलग चौथा सामना जिंकत अंतिम फेरीत धडक दिलीय. पाकिस्तानने बांगलादेशवर मात करुन आशिया कप ट्रॉफीवर १ हात ठेवला आहे. पाकिस्तानने त्याआधी साखळी फेरीत यूएई, भारत आणि नेपाळवर मात केली. तर भारताने साखळी फेरीत नेपाळ आणि यूएईवर विजय मिळवला.

पाकिस्तानने उपांत्य फेरीतील पहिल्या सामन्यात बांगलादेशचा ९ विकेट्सने धुव्वा उडवला. पाकिस्तानने विजयासाठी मिळालेलं १३९ धावांचं आव्हान हे अवघ्या २१.५ ओव्हरमध्ये पूर्ण केलं. पाकिस्तानचा हा सलग चौथा विजय ठरला. त्यानंतर भारताने लक्ष्य रायचंदानी याच्या नेतृत्वात सेमी फायनलमध्ये अफगाणिस्तानचा ८ विकेट्सने धुव्वा उडवला. भारताने २२८ धावांचं आव्हान ३७ व्या ओव्हरमध्ये पूर्ण केलं. अशाप्रकारे दोन्ही संघांनी अंतिम फेरीत प्रवेश मिळवला.

भारत-पाकिस्तान सलग दुसऱ्यांदा अंतिम फेरीत

भारतीय संघाची अंडर १९ आशिया कप स्पर्धेच्या इतिहासात अंतिम फेरीत पोहचण्याची एकूण 11 वेळ ठरली. तर पाकिस्तानची ही सलग दुसरी आणि एकूण चौथी वेळ ठरलीय. विशेष म्हणजे दोन्ही संघांची या स्पर्धेच्या अंतिम फेरीत पोहचण्याची ही सलग आणि एकूण दुसरी वेळ ठरलीय. पाकिस्तान गतविजेता आहे. पाकिस्तानने भारताला गेल्या वर्षी पराभूत करत ट्रॉफी उंचावली होती. त्यामुळे आता पाकिस्तान ट्रॉफी कायम राखणार की टीम इंडिया हिशोब करणार? हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

अंतिम सामन्याबाबत महत्त्वाची माहिती

सामना शनिवारी १४ नोव्हेंबरला होणार आहे. हा सामना अल अमिरात क्रिकेट ग्राउंडमध्ये होणार आहे. सामन्याला भारतीय वेळेनुसार सकाळी १० वाजून ३० मिनिटांनी सुरुवात होणार आहे. सामना टीव्हीवर सोनी स्पोर्ट्स नेटवर्कवरील चॅनेल्सवर पाहायला मिळेल. तर सोनी लिव्ह एपद्वारे मोबाईल, लॅपटॉप आणि स्मार्ट टीव्हीवर सामना पाहायला मिळेल.

टीम इंडिया ५ वर्षांची प्रतिक्षा संपवणार?

दरम्यान टीम इंडियाकडे अंडर १९ आशिया कप जिंकून गेल्या ५ वर्षांची प्रतिक्षा संपवण्याची संधी आहे. टीम इंडियाने एकूण ८ वेळा आशिया चॅम्पियन होण्याची कामगिरी केली आहे. मात्र भारताला २०२१ नंतर ही ट्रॉफी जिंकण्यात यश आलेलं नाही. भारताला २०२४ आणि २०२५ मध्ये उपविजेता म्हणून समाधान मानावं लागलं. त्यामुळे आता लक्ष्य रायचंदानी त्याच्या नेतृत्वात ही प्रतिक्षा संपवणार का? याकडे साऱ्या भारतीय चाहत्यांचं लक्ष असणार आहे.

चौथ्या वनडेत भारत 89 वर ऑलआऊट, न्यूझीलंडचा 244 धावांनी विजय, एकट्या बॉलरने फिरवला सामना

■ मुंबई : वृत्तसंस्था

चौथ्या वनडे सामन्यात न्यूझीलंड संघाने भारताचा २४४ धावांनी पराभव केला आहे. न्यूझीलंडने पहिल्यांदा फलंदाजी करताना ३३३ धावांचा डोंगर उभा केला होता.

विल यंग याच्या शतकी खेळीच्या किवींनी ३०० धावांचा टप्पा पार केला. मात्र या आव्हानाचा पाठलाग करण्यासाठी उतरलेला भारतीय संघ ८९ धावांवर ऑलआऊट झाला. मॅट हेन्री याने पहिल्याच ओव्हरमध्ये तीन विकेट घेत बॅकफूटवर ढकलले होते. टॉप ऑर्डरमधील प्रमुख फलंदाज आऊट झाल्यावर भारतीय संघाला पुन्हा कमबॅकच करता आले नाही. आज भारताच्या आठ खेळाडूंना धावसंख्येत दुहेरी आकडाही गाठता आला नाही. भारताकडून ईशन किशन याने सर्वाधिक २७ धावांची खेळी केली. तर अक्षर पटेल आणि नमन धीर यांनी प्रत्येकी २१ धावा केल्या. न्यूझीलंडकडून मॅट हेन्री याने सर्वाधिक ६ विकेट्स घेत संपूर्ण सामना फिरवला.

या पराभवासह पाच सामन्यांची मालिका २-१ अशी झाली आहे. भारताची वनडे क्रिकेटमधील ही सहावी नीचांकी धावसंख्या आहे.

भारतीय संघ धावांचा पाठलाग करण्यासाठी उतरला तेव्हा पहिल्याच चेंडूवर रोहित शर्माच्या विकेटने भारताला धक्का बसला. विराट कोहली



मैदानात उतरल्यावर तो भारताचा डाव सावरेल अशी आशा होती. पण विराटही बोल्ड झाला त्यापाठोपाठ आलेला कॅप्टन श्रेयस अय्यरही पायचीत झाला. या ओव्हरमध्ये दुखापतीनंतर कमबॅक करणाऱ्या मॅट हेन्री याने आपल्या भेदक बॉलिंगने या महत्त्वाच्या तीन विकेट घेतल्याआणि इथेच सामना फिरला.

कारण ३३४ धावांचा पाठलाग करताना टॉप ऑर्डरमधील तीन खेळाडू शून्यावर माघारी गेल्याने पूर्ण दबाव इतर फलंदाजांवर आला होता. ईशान किशन याने लढण्याचा प्रयत्न केला पण त्यालाही हेन्रीनेच २७ धावांवर बोल्ड करत आणखीन एक धक्का दिला. अक्षर पटेल २१ धावा आणि नमन धीरही २१ धावा करून शेवटी मोठे फटके मारताना कॅच आऊट झाला. न्यूझीलंडकडून मॅट हेन्रीने ६ विकेट आणि मॅथ्यू फिशर याने ३ विकेट घेतल्या.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

ऐतिहासिक दिलासा ; वडिलांनी उभे केले शेतकरी; पुत्राने त्यांच्या १८१ वारसांना मिळवून दिला न्याय!

एका ऐतिहासिक निर्णयाने १८१ वारसांना दिलासा; धनंजय मुंडेंच्या पाठपुराव्याने वसंतनगरचा प्रश्न निकाली!

भूमिहीनांच्या आयुष्यात शेतीचा प्रकाश आणणाऱ्या सखाराम नाईक यांच्या कार्याला पुत्राकडून वारसांचा हक्क मिळवून दिला

स्व.सखारामजी नाईक यांच्या दूरदृष्टीचा वारसा डी. एस. राठोड यांनी जपला; धनंजय मुंडेंच्या पाठपुराव्याने सहा दशकांपासूनचा प्रश्न मार्गी

वर्ग-२ मधील जमिनी वर्ग-१ मध्ये रूपांतरित करण्यास शासनमान्यता; ४९ मूळ शेतकरी कुटुंबांच्या १८१ वारसांना मोठा दिलासा

परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :

एखाद्या पिढीने संघर्ष करून मिळवून दिलेला हक्क पुढच्या पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठीही तितकाच संघर्ष करावा लागतो, याचे जिवंत उदाहरण वसंतनगर तांड्यात पाहायला मिळत आहे. सुमारे सहा दशकांपूर्वी भूमिहीन बंजारा समाजातील शेतकऱ्यांना जमिनी मिळवून देऊन त्यांच्या जीवनाला नवी दिशा देणारे स्व.सखारामजी नाईक यांचे स्वप्न त्यांच्या पुत्राने पूर्णत्वाकडे नेले आहे. स्व.सखारामजी नाईक यांचे पुत्र डी. एस. राठोड यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला आणि माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे यांच्या विशेष प्रयत्नांना यश आले असून, वसंतनगर येथील ४९ मूळ शेतकरी कुटुंबांच्या १८१ वारसांचा अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला जमिनीचा प्रश्न अखेर मार्गी लागला आहे. वारस फेरफार आणि वर्ग-२ मधील जमिनी वर्ग-१ मध्ये रूपांतरित करण्यासाठी शासनमान्यता मिळाल्याने या कुटुंबांना मोठा दिलासा मिळाला आहे.



■ *भूमिहीनांना शेतकरी बनविण्याचा ऐतिहासिक पुढाकार!*

सन १९६० ते १९६२ हा काळ वसंतनगर तांड्याच्या इतिहासातील महत्त्वाचा टप्पा ठरला. त्या काळात बंजारा समाजातील अनेक कुटुंबांकडे उदरनिर्वाहासाठी स्वतःची शेती नव्हती. भूमिहीन अवस्थेत जीवन जगणाऱ्या या कुटुंबांना शेतीचा आधार मिळावा, त्यांना स्वतःच्या पायावर उभे राहता यावे आणि त्यांच्या पुढील पिढ्यांचे भविष्य सुरक्षित व्हावे, या उदात्त विचारातून कै. सखारामजी नाईक यांनी पुढाकार घेतला. तत्कालीन मुख्यमंत्री वसंतरावजी नाईक यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करून त्यांनी ४९ भूमिहीन शेतकरी कुटुंबांना प्रत्येकी १० एकर जमीन मिळवून दिली. याशिवाय गावठाणासाठी स्वतंत्र १० एकर जमीन उपलब्ध करून देण्यात आली. या जमिनीच्या माध्यमातून केवळ शेतीचा व्यवसाय सुरू झाला नाही, तर एका नव्या गावाची आणि शेतकरी कुटुंबांच्या स्वावलंबी वाटचालीची पायाभरणी झाली. कै. सखारामजी नाईक यांच्या प्रयत्नांतून वसंतनगर तांड्याची उभारणी झाली आणि अनेक कुटुंबांना जगण्याचा नवा आधार मिळाला.

■ पुढच्या पिढीचा संघर्ष; १८१ वारसांच्या हक्कासाठी धडपड!

काळ बदलला, मूळ लाभार्थी शेतकऱ्यांची पुढची पिढी मोठी झाली. आज या ४९ मूळ शेतकरी कुटुंबांच्या वारसांची संख्या १८१ झाली आहे. मात्र, मूळ शेतकऱ्यांना मिळालेल्या जमिनींचा वारस फेरफार करणे आणि वर्ग-२ मधील जमिनी वर्ग-१ मध्ये रूपांतरित करून घेणे या प्रक्रियेत अनेक प्रशासकीय अडचणी निर्माण झाल्या होत्या. परिणामी, वारसांना आपल्या जमिनींच्या नोंदी अद्ययावत करून घेणे, तसेच विविध शासकीय सवलती आणि अधिकारांचा लाभ मिळविण्यात अडथळे येत होते. हा प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित असल्याने शेतकरी कुटुंबीयांची मोठी गैरसोय होत होती. वडिलांनी मोठ्या संघर्षातून मिळवून दिलेल्या जमिनींचे हक्क आपल्या वारसांना सुलभतेने मिळावेत, यासाठी डी. एस. राठोड यांनी हा प्रश्न तडीस नेण्याचा निर्धार केला.

■ धनंजय मुंडेंची साथ; मंत्रालयापासून तहसील कार्यालयापर्यंत पाठपुरावा!

हा प्रश्न सोडविण्यासाठी डी. एस. राठोड यांनी माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे यांची भेट घेऊन वसंतनगरच्या शेतकरी कुटुंबांची व्यथा आणि प्रशासकीय अडचणी त्यांच्या निदर्शनास आणून दिल्या. त्यानंतर धनंजय मुंडे यांनी या प्रश्नात विशेष लक्ष घालून शासनस्तरावर पाठपुरावा केला. डी. एस. राठोड यांनीही मंत्रालयापासून मुंबईपर्यंत तसेच तहसीलदार कार्यालय आणि तलाठी कार्यालयापर्यंत वारंवार भेटी देऊन आवश्यक कागदपत्रे, प्रशासकीय प्रक्रिया आणि प्रस्तावांच्या पूर्ततेसाठी सातत्याने प्रयत्न केले. केवळ निवेदन देऊन थांबण्याऐवजी प्रत्येक टप्प्यावर पाठपुरावा करीत हा प्रश्न मार्गी लागेपर्यंत त्यांनी प्रयत्न सुरू ठेवले. धनंजय मुंडे यांच्या शासनस्तरीय पाठपुराव्यामुळे अखेर या प्रश्नाला सकारात्मक दिशा मिळाली आणि संबंधित जमिनींच्या वारस फेरफारासह वर्ग-२ मधून वर्ग-१ मध्ये रूपांतर करण्यासाठी शासनाची मान्यता मिळाली.

■ चार गट क्रमांकांतील जमिनींचा प्रश्न निकाली; १८१ वारसांना दिलासा!

परळी वैजनाथ येथील वसंतनगर परिसरातील गट क्रमांक ४६६, ४६८, ४६९ आणि ४७८ मधील संबंधित जमिनींच्या संदर्भात हा निर्णय महत्त्वपूर्ण ठरला आहे. ४९ मूळ शेतकरी कुटुंबांच्या १८१ वारसांचा अनेक वर्षांपासूनचा प्रश्न मार्गी लागल्याने त्यांच्या जमिनींच्या हक्कासंदर्भातील प्रशासकीय अडथळे दूर होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या निर्णयामुळे पुढील पिढीला आपल्या हक्काच्या जमिनींच्या नोंदी आणि आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करण्यास मदत होणार आहे.

■ एका पिढीने जमिनी दिल्या, दुसऱ्या पिढीने हक्क मिळवून दिले!


वसंतनगरच्या या घटनेत दोन पिढ्यांच्या संघर्षाची आणि सामाजिक बांधिलकीची प्रेरणादायी कहाणी दडलेली आहे. स्व.सखारामजी नाईक यांनी भूमिहीन कुटुंबांना शेतीचा आधार देऊन त्यांना स्वाभिमानाने जगण्याची संधी मिळवून दिली होती. त्याच सामाजिक जाणिवेचा वारसा पुढे नेत त्यांचे पुत्र डी. एस. राठोड यांनी १८१ वारसांच्या जमिनींचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. धनंजय मुंडे यांनीही या प्रश्नाला शासनस्तरावर न्याय मिळवून देण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यामुळे वसंतनगरमधील शेतकरी कुटुंबीयांनी धनंजय मुंडे आणि डी. एस. राठोड यांचे आभार मानले आहेत.

एका पिढीने भूमिहीनांना शेतकरी बनविले, तर दुसऱ्या पिढीने त्या शेतकऱ्यांच्या वारसांच्या हक्काचा मार्ग मोकळा केला. जमिनीचा एक तुकडा मिळवून देण्यापासून ते त्या जमिनीवरील हक्क पुढच्या पिढीपर्यंत पोहोचविण्यापर्यंतचा हा प्रवास वसंतनगरच्या इतिहासातील महत्त्वपूर्ण आणि स्मरणीय घडामोड ठरली आहे.

■ वडिलांनी भूमिहीनांना जमीन मिळवून दिली; पुत्राने १८१ वारसांचा हक्क मिळवून दिला!

स्व.सखारामजी नाईक यांच्या सामाजिक कार्याचा वारसा डी. एस. राठोड यांनी कृतीतून पुढे नेला!**

इतिहास घडविण्यासाठी केवळ मोठी पदे नव्हे, तर समाजासाठी काहीतरी करण्याची तळमळ आवश्यक असते. स्व.सखारामजी नाईक यांनी सहा दशकांपूर्वी बंजारा समाजातील ४९ भूमिहीन शेतकरी कुटुंबांना प्रत्येकी १० एकर जमीन मिळवून देण्यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री वसंतरावजी नाईक यांच्याकडे पाठपुरावा केला होता. त्यांच्या प्रयत्नांतून अनेक कुटुंबांच्या आयुष्याला शेतीचा आधार मिळाला. आज त्याच ४९ शेतकरी कुटुंबांच्या १८१ वारसांचा जमिनीचा प्रश्न प्रलंबित होता. वडिलांनी मिळवून दिलेल्या जमिनींचे हक्क पुढच्या पिढीला मिळावेत, या उद्देशाने त्यांचे पुत्र डी. एस. राठोड यांनी हा प्रश्न स्वतःच्या जबाबदारीने हाती घेतला. माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे यांची भेट घेऊन त्यांनी वारंवार पाठपुरावा केला. मंत्रालयापासून तहसीलदार आणि तलाठी कार्यालयापर्यंत सातत्याने प्रयत्न करून प्रशासकीय स्तरावरील अडचणी दूर करण्यासाठी धडपड केली. अखेर त्यांच्या प्रयत्नांना यश आले आणि १८१ वारसांच्या जमिनींचा प्रश्न मार्गी लागला. वडिलांनी भूमिहीनांना जमिनीचा आधार दिला आणि पुत्राने त्या जमिनींचे हक्क वारसांपर्यंत पोहोचविण्यासाठी संघर्ष केला. त्यामुळे डी. एस. राठोड यांनी वडिलांचा सामाजिक कार्याचा वारसा केवळ जपला नाही, तर तो पुढे नेल्याची भावना वसंतनगरच्या शेतकरी कुटुंबांतून व्यक्त होत आहे.



आंतरराष्ट्रीय पुरुष दिनानिमित्त विशेष लेख

पुरुषाचे खरे सौंदर्य चेहऱ्यात नसते, ते त्याच्या माणूसपणात असते!



डॉ. सुवर्णा कराड
प्रदेशाध्यक्ष, वंजारी महासंघ
महिला आघाडी, महाराष्ट्र राज्य

दरवर्षी १९ नोव्हेंबर हा दिवस आंतरराष्ट्रीय पुरुष दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवसाची सुरुवात १९९९ मध्ये त्रिनिदाद आणि टोबॅगो येथे झाली. इतिहासाचे प्राध्यापक डॉ. जेरोम टीलक्सिंग यांनी या दिवसाची संकल्पना पुढे आणली. विशेष म्हणजे, १९ नोव्हेंबर हा त्यांच्या वडिलांचा जन्मदिवस होता. वडिलांमधील आदर्श पितृत्व आणि सकारात्मक पुरुषत्वाचा गौरव करण्याच्या भावनेतून त्यांनी या तारखेची निवड केली. पुरुषांचे सामाजिक योगदान, आरोग्य, भावनिक प्रश्न आणि सकारात्मक पुरुष आदर्श यांविषयी जागरूकता निर्माण करणे हा या दिवसाचा उद्देश आहे.

पुरुष दिन हा महिला दिनाच्या विरोधात सुरू झालेला नाही. स्त्री-पुरुष समानतेच्या व्यापक विचारात पुरुषांच्या योगदानाची आणि त्यांच्या प्रश्नांचीही दखल घेतली जावी, ही त्यामागील भूमिका आहे.

पुरुषाच्या सौंदर्याची व्याख्या आपण नेहमी त्याच्या दिसण्यावरून करतो. देखणा चेहरा, रुबाबदार व्यक्तिमत्त्व आणि आकर्षक कपडे एखाद्याला उठावदार बनवतात; परंतु माणूस म्हणून त्याचे खरे सौंदर्य त्याच्या स्वभावात, विचारांत आणि वागण्यात असते. बाह्यरूप आकर्षित करू शकते; पण मन जिंकण्यासाठी माणुसकी लागते.

खऱ्या अर्थाने सुंदर पुरुष तो असतो, जो समोरच्या व्यक्तीचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतो. प्रत्येक वेळी स्वतःचेच म्हणणे खरे ठरवण्याचा आग्रह धरत नाही. दुसऱ्यांच्या भावना समजून घेतो, त्यांच्या अडचणींची जाणीव ठेवतो आणि गरजेच्या वेळी आधार देतो. वेळेवर केलेली विचारपूस, संकटात दिलेली साथ आणि न सांगताही केलेली मदत यातून त्याचे व्यक्तिमत्त्व खुलते.

स्वतःच्या चुका मान्य करणे, गरज पडल्यास माफी मागणे, दिलेला शब्द पाळणे आणि जबाबदारी स्वीकारणे हेही पुरुषाच्या व्यक्तिमत्त्वाचे महत्त्वाचे गुण आहेत. अधिकार गाजवण्यापेक्षा विश्वास संपादन करणे अधिक महत्त्वाचे असते.

पुरुषाने नेहमी कणखरच असले पाहिजे, त्याने भावना व्यक्त करू नयेत, त्याने रडू नये, अशी पारंपरिक अपेक्षा समाजाने निर्माण केली आहे. मात्र पुरुषही माणूसच आहे. त्यालाही दुःख होते, एकटेपणा जाणवतो आणि प्रेम, आपुलकी व समजून घेणाऱ्या माणसांची गरज असते. कुटुंबासाठी अनेक जबाबदाऱ्या पार पाडताना त्यालाही कधी तरी कोणीतरी आपली विचारपूस करावी, आपले मन समजून घ्यावे, असे वाटत असते.

कुटुंबासाठी झटणारा पिता, मुलांच्या भवितव्यासाठी धडपडणारा माणूस, जोडीदाराच्या सुखदुःखात सहभागी होणारा पती, संकटात मदतीला धावणारा मित्र आणि समाजासाठी काम करणारा कार्यकर्ता अशा अनेक भूमिका पुरुष पार पाडत असतो. या प्रत्येक भूमिकेमागे त्याचा संघर्ष, त्याग आणि भावनिक गुंतवणूक असते. मात्र अनेकदा या योगदानाची पुरेशी दखल घेतली जात नाही.

■ पुरुषांचा गौरव करण्याची जबाबदारी नेमकी कुणाची?

हा प्रश्न विचारणेही महत्त्वाचे आहे. पत्नीने पतीच्या कष्टांची दखल घ्यावी, मुलांनी वडिलांच्या त्यागाची जाणीव ठेवावी, कुटुंबाने त्याच्या भावनिक गरजा समजून घ्याव्यात आणि समाजाने त्याच्या सकारात्मक योगदानाचा सन्मान करावा. पुरुषांनीही एकमेकांच्या कर्तृत्वाची आणि चांगल्या गुणांची दखल घेतली पाहिजे.

पुरुषाचा गौरव करण्यासाठी एखाद्या विशेष दिवसाची वाट पाहण्याची गरज नाही. त्याच्या कष्टांची दखल घेणारे कुटुंब आणि त्याच्या योगदानाचा सन्मान करणारा समाज त्याच्या आयुष्यात असला पाहिजे. पुरुषांचा सन्मान महिलांनी करावा आणि महिलांचा सन्मान पुरुषांनी करावा, एवढेच नव्हे, तर प्रत्येक माणसाने दुसऱ्या माणसाचा सन्मान करावा. सन्मानाची संस्कृती ही परस्परांच्या वागण्यातून निर्माण होत असते.

हे गुण केवळ पुरुषांपुरते मर्यादित नाहीत. स्त्री असो वा पुरुष, माणसाचे खरे सौंदर्य त्याच्या माणुसकीतच असते. स्त्री आणि पुरुष हे प्रतिस्पर्धी नसून एकमेकांचे सहप्रवासी आहेत. समानता, विश्वास आणि परस्पर आदर यांतूनच निकोप कुटुंब आणि समाज निर्माण होतो.

चेहऱ्याचे सौंदर्य काळानुसार बदलते; पण चांगला स्वभाव, संवेदनशीलता आणि माणसांशी जपलेली नाती कायम लक्षात राहतात. पुरुषाचा गौरव म्हणजे केवळ त्याच्या अधिकारांचा गौरव नव्हे, तर त्याच्या जबाबदाऱ्यांचा, संघर्षाचा, संवेदनशीलतेचा आणि माणूस म्हणून असलेल्या अस्तित्वाचा सन्मान होय.

देखणा चेहरा काही क्षणांसाठी आकर्षित करतो; पण सुंदर स्वभाव आयुष्यभर लक्षात राहतो. पुरुषाचे खरे सौंदर्य तो कसा दिसतो यात नसते, तर त्याच्या सहवासात इतरांना किती सुरक्षित, आनंदी आणि आपलेपणाचे वाटते यात असते!

■ पुरुष दिनानिमित्त शुभेच्छा:

पुरुषांच्या आयुष्यातील संघर्ष, कुटुंबाप्रती असलेली बांधिलकी, सामाजिक योगदान आणि भावनिक विश्व यांचा सन्मान व्हायला हवा. पुरुषाने केवळ कुटुंबाचा आधार बनू नये, तर त्यालाही प्रेम, आपुलकी आणि समजून घेणारा सहवास मिळावा. परस्पर सन्मान, समानता आणि विश्वास यातूनच निकोप समाजाची निर्मिती होते.

सर्व पुरुषांना आंतरराष्ट्रीय पुरुष दिनाच्या मनःपूर्वक शुभेच्छा!

दैनिक
अतुल्य महाराष्ट्र
● बीड, शुक्रवार, 20 नोव्हेंबर 2026
Last page

धावडीच्या पाणीप्रश्नावर महत्त्वपूर्ण पाऊल! सुरवसे वस्ती ते धावडी गावापर्यंत पाइपलाइनच्या कामाला सुरुवात





मा. काशिनाथ घुले यांच्या मार्गदर्शनाखाली पाणीपुरवठ्याचा प्रश्न सोडविण्यासाठी पुढाकार; ग्रामस्थांमधून समाधान आणि कामाचे स्वागत!

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

अंबाजोगाई तालुक्यातील मौजे धावडी येथील नागरिकांच्या पाणीप्रश्नावर तोडगा काढण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. सुरवसे वस्ती ते धावडी गावापर्यंत पाइपलाइन टाकण्याच्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात झाली असून, या कामामुळे गावातील पाणीपुरवठा व्यवस्थेला मोठा आधार मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

मा. काशिनाथ घुले यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम हाती घेण्यात आला असून, ग्रामीण भागातील नागरिकांची पाण्यासाठी होणारी गैरसोय दूर करण्याच्या उद्देशाने या कामाला प्राधान्य देण्यात आले आहे. पाणी ही प्रत्येक नागरिकाची मूलभूत गरज असून, गावातील पाणीपुरवठ्याचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागावा, यासाठी या पाइपलाइनच्या कामाची सुरुवात करण्यात आली आहे.

धावडी गावासह सुरवसे वस्ती परिसरातील नागरिकांसाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे. पाइपलाइनचे काम पूर्ण झाल्यानंतर पाणीपुरवठा अधिक सुलभ होण्यास मदत होईल, अशी अपेक्षा ग्रामस्थांकडून व्यक्त केली जात आहे.

विशेषतः ग्रामीण भागातील महिलांना आणि नागरिकांना पाण्यासाठी करावी लागणारी धावपळ कमी होण्याच्या दृष्टीनेही हे काम महत्त्वाचे मानले जात आहे.

गावाच्या विकासासाठी केवळ आश्वासने न देता नागरिकांच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी प्रत्यक्ष कामाला सुरुवात होणे ही समाधानाची बाब असल्याची भावना ग्रामस्थांमधून व्यक्त होत आहे. पाणीप्रश्न सोडविण्यासाठी पुढाकार घेतल्याबद्दल मा. काशिनाथ घुले यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या या कामाचे ग्रामस्थांकडून स्वागत करण्यात येत आहे.

धावडीच्या विकासाच्या दृष्टीने पाइपलाइनचे हे काम महत्त्वाचा टप्पा ठरणार असून, लवकरात लवकर काम पूर्ण होऊन ग्रामस्थांना सुरळीत पाणीपुरवठ्याचा लाभ मिळावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

वसंतराव मुंडे यांची किसान काँग्रेसच्या वरिष्ठ उपाध्यक्षपदी नियुक्त

परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :

काँग्रेस पक्षाच्या विचारधारेशी गेल्या चार दशकांपासून एकनिष्ठ राहून पक्षसंघटनेसाठी सातत्याने कार्य करणारे ज्येष्ठ नेते तथा कार्यकर्ते वसंतराव मुंडे यांची महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या किसान काँग्रेसच्या वरिष्ठ उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या प्रदीर्घ राजकीय प्रवासाची, पक्षनिष्ठेची आणि संघटनात्मक कार्याची दखल घेत पक्षाने ही महत्त्वपूर्ण जबाबदारी त्यांच्यावर सोपविली आहे. या नियुक्तीमुळे परळी वैजनाथसह बीड जिल्ह्यातील काँग्रेस कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

पक्षसंघटनेत काम करताना अनेक चढ-उतार आणि कठीण काळातही वसंतराव मुंडे यांनी विचारधारा आणि बांधिलकी जपत सामान्य नागरिक, शेतकरी आणि ग्रामीण भागातील प्रश्नांशी आपली नाळ घट्ट ठेवली. त्यांच्या या सातत्यपूर्ण कार्याची वरिष्ठ नेतृत्वाने दखल घेतली आहे.



■ वरिष्ठ नेतृत्वाच्या विश्वासातून जबाबदारी

काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, काँग्रेसचे गटनेते विजय वडेट्टीवार आणि किसान काँग्रेसचे अध्यक्ष पराग पास्ते यांनी दाखवलेला विश्वास आणि दिलेली जबाबदारी ही आपल्या एकनिष्ठ पक्षकार्याची पावती असल्याची भावना वसंतराव मुंडे यांनी व्यक्त केली. या निवडीबद्दल त्यांनी वरिष्ठ नेत्यांचे मनःपूर्वक आभार मानत दिलेली जबाबदारी पूर्ण निष्ठेने आणि प्रामाणिकपणे पार पाडण्याचा निर्धार व्यक्त केला.

■ शेतकऱ्यांचे प्रश्न केंद्रस्थानी ठेवून काम करणार

राज्यातील शेतकरी आज नैसर्गिक, आर्थिक आणि प्रशासकीय अशा विविध संकटांचा सामना करत आहेत. विशेषतः मराठवाड्यातील दुष्काळी स्थिती, अनियमित पाऊस, पिकांचे नुकसान, पीकविमा कंपन्यांकडून नुकसानभरपाई मिळण्यातील अडचणी, तसेच जनावरांसाठी चारा आणि पाण्याची टंचाई या प्रश्नांनी शेतकरी त्रस्त आहेत.

पीकविमा आणि नुकसानभरपाईचा प्रश्न, दुष्काळग्रस्तांना मदत, जनावरांसाठी चारा छावण्या व पाणी उपलब्धता, शेतमालाला योग्य भाव आणि शेतकऱ्यांच्या प्रलंबित मागण्या या मुद्द्यांना प्राधान्य देऊन काम करण्याचा प्रयत्न राहील, असे मुंडे यांनी स्पष्ट केले. समस्या केवळ निवेदनांपुरत्या मर्यादित न ठेवता त्या शासन-प्रशासनाच्या निदर्शनास आणून देणे, शेतकऱ्यांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देणे आणि न्याय्य मागण्यांसाठी संघटनात्मक पातळीवर सातत्याने पाठपुरावा करणे, हा किसान काँग्रेसच्या माध्यमातून मुख्य उद्देश राहील, असेही त्यांनी नमूद केले.

■ मराठवाड्यासह राज्यभरातील शेतकऱ्यांना न्याय देण्याचा मानस

मराठवाडा आणि विदर्भ हे सातत्याने दुष्काळ, पाणीटंचाई व शेतीविषयक संकटांचा सामना करणारे भाग आहेत. हमीभाव, वेळेवर आर्थिक मदत, पीकविमा योजनांची प्रभावी अंमलबजावणी, चारा-पाण्याची व्यवस्था आणि शेतकऱ्यांच्या आर्थिक अडचणींवर ठोस उपाययोजना होणे गरजेचे आहे. या पार्श्वभूमीवर मराठवाड्यासह संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकरी बांधवांच्या प्रश्नांना प्राधान्य देऊन त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे त्यांनी सांगितले.

■ सहकारी, कार्यकर्ते व हितचिंतकांचे आभार

गेल्या अनेक वर्षांपासून साथ देणारे पक्षातील सहकारी, मित्रपरिवार, ज्येष्ठ मंडळी आणि हितचिंतकांचे वसंतराव मुंडे यांनी विशेष आभार मानले. सर्वांचे प्रेम, विश्वास, आशीर्वाद आणि सहकार्य हीच आपली खरी ताकद असल्याचे त्यांनी सांगितले. हे पद म्हणजे केवळ पदाची जबाबदारी नसून शेतकऱ्यांच्या हितासाठी काम करण्याची मोठी संधी असल्याचे सांगत त्यांनी पक्षविचारांचा प्रसार आणि शेतकऱ्यांचे हित जोपासण्याचा निर्धार व्यक्त केला. या नियुक्तीबद्दल विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन होत आहे.

शाळेत जात असताना अल्पवयीन मुलीला अनोळखी व्यक्तीकडून घेऊन गेल्याची घटना!

भातोडीतील प्रकारानंतर पालकांमध्ये चिंता; मुलांच्या सुरक्षिततेबाबत विशेष काळजी घेण्याची आवश्यकता

देऊळगाव (आदिनाथ ठोंबरे)

दौलावडगाव ता.आष्टी जि.बीड जवळील भातोडी, जि. अहिल्यानगर येथे शाळेत जात असलेल्या अंदाजे १० ते १२ वर्षांच्या अल्पवयीन मुलीला अनोळखी व्यक्तीने वाहनातून घेऊन गेल्याची गंभीर घटना १८ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी सुमारे ९ वाजण्याच्या सुमारास घडल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकारामुळे भातोडीसह परिसरातील पालकांमध्ये मोठी चिंता निर्माण झाली असून, शाळकरी मुलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शाळेत जात असताना मुलीला अनोळखी व्यक्तीने वाहनातून सोबत नेल्याचे सांगण्यात येत आहे. त्यानंतर वाहन अहिल्यानगर शहराच्या दिशेने गेल्याचे समजते. शहरात वाहनाचा वेग कमी झाल्यानंतर मुलीने आरडाओरडा केला आणि ती वाहनातून बाहेर पडल्याची किंवा संबंधित व्यक्तीने तिला रस्त्यात सोडून दिल्याची माहिती समोर आली आहे.

रस्त्यावर आढळलेल्या मुलीला जागरूक नागरिकांनी अहिल्यानगर येथील कोतवाली पोलिस ठाण्यात नेऊन पोलिसांच्या स्वाधीन केले. सुरुवातीला मुलीला स्वतःचे नाव व गाव विचारून तिच्या पालकांशी संपर्क झाला. त्यानंतर पालकांनी कोतवाली पोलिस ठाण्यात जाऊन मुलीला ताब्यात घेतले.

दरम्यान, मुलीला गुंगी येईल असे काही पदार्थ देण्यात आले होते का किंवा तिच्यावर कोणतेही अमली अथवा गुंगी आणणारे द्रव्य वापरण्यात आले होते का, याबाबत चर्चा सुरू आहे. मात्र याबाबत अद्याप अधिकृत निष्कर्ष समोर आलेला नसून, या शक्यतेची पोलिसांकडून चौकशी होणे आवश्यक आहे. घटनेमागील नेमके कारण, मुलीला वाहनातून घेऊन जाणारी व्यक्ती कोण होती आणि तिचा या घटनेमागील उद्देश काय होता, याचा तपास तातडीने पोलिसांकडून केला जात आहे.

या घटनेच्या पार्श्वभूमीवर पालकांनी आपल्या मुलांच्या सुरक्षिततेकडे विशेष लक्ष देण्याचे आवश्यकता आहे. लहान मुलांना शक्यतो एकट्याने शाळेत पाठवू नये. शाळेत जाताना तसेच शाळेतून घरी परतताना त्यांच्यावर लक्ष ठेवावे. अनोळखी व्यक्तीकडून चॉकलेट, खाऊ, खेळणी किंवा अन्य कोणतेही आमिष स्वीकारू नये तसेच अनोळखी व्यक्तीसोबत कुठेही जाऊ नये, याबाबत मुलांना सातत्याने समज देणे गरजेचे आहे.

शाळेच्या परिसरात किंवा गावात संशयास्पद व्यक्ती अथवा वाहन आढळल्यास नागरिकांनी स्वतःहून कायदा हातात न घेता तातडीने पोलिसांना माहिती द्यावी. तसेच प्रत्येक मुलाला स्वतःचे नाव, आई-वडिलांचे नाव, गावाचे नाव आणि आपत्कालीन परिस्थितीत कोणाशी संपर्क साधायचा, याची माहिती असणे आवश्यक आहे.

या घटनेबाबत कोणत्याही प्रकारच्या अफवा पसरवू नयेत. अधिकृत माहितीवरच विश्वास ठेवावा आणि पोलिसांच्या तपासाला सहकार्य करावे. मुलांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत पालक, शिक्षक आणि ग्रामस्थांनी एकत्रितपणे सतर्क राहण्याची गरज या घटनेमुळे अधोरेखित झाली आहे.

कोळी महादेव महासंघाच्या बीड जिल्हाध्यक्षपदी गौरख आबा पूर्णे यांची निवड- निरडे सर

धारूर : कोळी महादेव समाजाच्या सामाजिक संघटनात्मक कार्याला बळकटी देण्यासाठी कोळी महादेव महासंघाच्या बीड जिल्हाध्यक्षपदी गौरव आबा पूर्णे यांची निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीमुळे समाजबांधवांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

गौरव आबा पूर्णे यांनी सामाजिक क्षेत्रात कार्य करत समाजाच्या एकजुटीसाठी आणि समाजाच्या विविध प्रश्नांसाठी योगदान द्यावे, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात येत आहे.

त्यांच्या निवडीबद्दल मित्रपरिवार, समाजबांधव आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. गौरव आबा पुर्णे यांच्या पुढील सामाजिक वाटचालीस हार्दिक शुभेच्छा!

मंठा शहरात मानधनाच्या मोबदल्यात घेतली लाच

मंठा | रोजगारसे वकाच्या मानधनाचा धनादेश देण्याच्या मोबदल्यात १३ हजार रुपयांच्या लाचेची मागणी करून त्यापैकी १० हजार रुपये स्वीकारताना ग्रामपंचायत अधिकारी तथा ग्रामसेवक अनिल तुकाराम चव्हाण (४९) याला जालना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने रंगेहाथ पकडले. ही कारवाई १८ नोव्हेंबर रोजी सायंकाळी मंठा शहरातील जालना रोडवरील धनश्री हॉटेल परिसरात करण्यात आली. दरम्यान, या ग्रामसेवकाला ६० हजार रुपये वेतन असल्याची माहिती सूत्रांकडून देण्यात आली आहे. हा ग्रामसेवक मंठा तालुक्यातील सावरगाव वायाळ येथे कार्यरत आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दिलेल्या प्रसिद्धिपत्रकानुसार , तक्रारदार हा ३२ वर्षीय रोजगारसेवक असून, ग्रामपंचायत अधिकारी अनिल चव्हाण यांनी ३० ऑक्टोबर २०२६ रोजी तक्रारदाराच्या २४ हजार रुपयांच्या मानधनाचा धनादेश दिल्यानंतर त्याच्या मोबदल्यात सहा हजार रुपयांची मागणी केली होती. त्यावेळी तक्रारदाराने एक हजार रुपये दिले होते, तर उर्वरित पाच हजार रुपये नंतर देण्याचे सांगितले होते. त्यानंतर १७ नोव्हेंबर रोजी तक्रारदाराला ४८ हजार रुपयांचा दुसरा मानधनाचा धनादेश देताना चव्हाण यांनी आठ हजार रुपये आणि यापूर्वीचे पाच हजार रुपये असे एकूण १३ हजार रुपयांची मागणी केली. मात्र, लाच देण्याची इच्छा नसल्याने तक्रारदाराने १८ नोव्हेंबर रोजी जालना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे लेखी तक्रार दाखल केली.

तक्रारीच्या अनुषंगाने पंचांसमक्ष पडताळणी -तक्रारीच्या अनुषंगाने पंचांसमक्ष पडताळणी करण्यात आली. त्यामध्ये १३ हजार रुपयांची लाच मागितल्याचे निष्पन्न झाल्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा रचला. यावेळी तक्रारदाराकडून १० हजार रुपयांची लाच स्वीकारताना अनिल तुकाराम चव्हाण यांना पथकाने रंगेहाथ पकडले. ही कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस उपअधीक्षक बाळू जाधवर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

अकवान आंध्र, ओडिशा किनारपट्टीला धडकले:हवेचा वेग ताशी 90km

'अकवान' (Akwan) चक्रीवादळ शुक्रवारी सकाळी साडेआठच्या सुमारास आंध्र प्रदेश आणि ओडिशाच्या सीमेवरील गोपाळपूर किनारपट्टीवर धडकले. ही प्रक्रिया सध्या सुरू असून ती पुढील दोन तास कायम राहण्याची शक्यता आहे. या काळात वाऱ्याचा वेग ताशी ७० ते ९० किलोमीटर इतका नोंदवला गेला आहे.

या वादळामुळे ओडिशा, आंध्र प्रदेश आणि पश्चिम बंगालमध्ये मुसळधार पाऊस पडत आहे. भारतीय हवामान विभागाच्या (IMD) माहितीनुसार, गेल्या सहा तासांत हे वादळ ताशी २१ किलोमीटर वेगाने उत्तर-वायव्य दिशेकडे सरकले आहे.

ओडिशामध्ये सुमारे ३ लाख लोकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आले आहे. एकूण २,५२३ मदत छावण्या उभारण्यात



आल्या असून ४२३ बचाव पथके तैनात करण्यात आली आहेत. पूर्व किनारपट्टी रेल्वेने (East Coast Railway) ४१ गाड्या रद्द केल्या आहेत, तर दक्षिण-पूर्व रेल्वेने (South Eastern Railway) २८ एक्सप्रेस गाड्या रद्द केल्या आहेत; याव्यतिरिक्त २९ गाड्यांच्या वेळापत्रकात बदल करण्यात आला आहे. या चक्रीवादळाचा परिणाम १० राज्यांवर जाणवण्याची शक्यता आहे.

अकवान चक्रीवादळाचा हा फोटो शुक्रवारी सकाळी ८ चा आहे. IMD ची या वादळावर करडी नजर आहे.

ओडिशा: भूस्खलनाचा धोका; दोन गावांतील ९० हून अधिक लोकांना सुरक्षित स्थळी हलवले

ओडिशामध्ये भूस्खलनाचा धोका लक्षात घेता, डारिंगबाडी अग्निशमन दल आणि स्थानिक पोलिसांनी 'उपर किलाबाडी' आणि 'तला किलाबाडी' या दोन गावांतील ९० हून अधिक लोकांना सुरक्षित स्थळी हलवले आहे.